Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# भारतातील सामाजिक न्यायाच्या चळवळीची मिमांसा

**प्रा. डॉ. कालिदास गणपतराव सूर्यवंशी**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.

**प्रास्ताविक -**

आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष जवळपास पूर्ण होत आहेत. आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतोय. पण त्या आधीच्या काळातील आपल्या देशाचे आर्थिक व्यवहार आणि सामाजिक जीवन पुष्कळशा प्रमाणात स्थिर आणि अपरिवर्तनीय स्वरूपाचे होते. भारतावर प्रत्यक्ष ब्रिटिश सत्तेचे नियंत्रण होते. त्यांच्या सहवासाने भारतात व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कायापालट होऊ लागला. काही उदारमतवादी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी भारतातील परिवर्तन प्रक्रियेला मोलाचा हातभार लावला. सतीची परंपरा बंद करण्यात पुढाकार होता. यांनीच नवीन इंग्रजी शिक्षणाची पायाभरणी केली. मोल्सवर्थ यांनी मराठी शब्दकोशाची उभारणी केली. मेजर कँडी यांनी मराठी भाषा व्यवहाराचे प्रमाणीकरण घडवून आणले. थोडक्यात परिवर्तनाला पोषक अशी अनेक धोरणे ब्रिटिश सरकारने राबविली.

**भारतातील आर्थिक प्रश्नाचा मागोवा -**

ब्रिटिशांनी भारत पादाक्रांत केल्यानंतर त्यांनी पद्धतशीर आर्थिक शोषणाला प्रारंभ केला. राजा मोहन राय यांनी ब्रिटिश राजवट भारताचे आर्थिक शोषण कसे करते हे सर्वात प्रथम दाखवून दिले. त्यांनी भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक दैन्यावरही प्रकाश टाकला. भारताच्या आर्थिक भवितव्याचे विवेचन करताना त्यांनी सुचवले की काही निवडक इंग्रज लोकांना कायम वास्तव्यासाठी भारतात आणावे. त्यामुळे भारतातील महसूल पद्धती व न्यायदान खाते यांच्यात वेगाने सुधारणा होतील आणि भारतात प्रगत विचार सरणीचा समाज निर्माण होईल असे ते समजत होते.[१] १९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिश व्यापारी प्रतिवर्षी भारतातून ३ लक्ष पौंड संपत्ती नेत होते. ती याच शतकाच्या अखेरीस ३ कोटी पौंड पर्यंत जाऊन पोहचली आणि त्याचा परिणाम भारतात ब्रिटिश साम्राज्य बळकट होण्यात आणि भारत मृत्यू पथाला लागण्यात झाला.[२]

न्यायमूर्ती म.गो. रानडे यांनी औद्योगिक प्रगती आणि ब्रिटिशाची व्यापार पद्धती याचा विशेष अभ्यास केला त्यांच्या मते भविष्यकालीन आर्थिक धोरण ठरवितांना देशाच्या भूतकालीन

आर्थिक परिस्थितीचा विचार केला पाहिजे. राष्ट्राच्या आर्थिक यंत्रणेत व्यक्तीला महत्त्व असले तरी समाजाच्या व्याप्त हितासाठी ब्रिटिश सरकारनेही महत्त्वाची भूमिका पार पाडली पाहिजे. भारतातील उद्योग धंद्यांना परदेशी उद्योगधंद्याच्या आणि व्यापाराच्या स्पर्धेपासून संरक्षण मिळावे. नवीन उद्योग चालू करण्यासाठी भारतीय उत्पादकांना भांडवल पुरवठा करण्यात यावा आणि भारतात ज्या मालाची निर्मिती होते अशा मालाची आयात होऊ देऊ नये किंवा त्यांच्यावर जबरदस्त कर बसवावा ही उपाय योजना सुचविली.[३]

**कल्याणकारी राज्य संकल्पना -**

ब्रिटिश विचारवंत जी.डी.एच. कोल यांनी ज्या समाजात प्रत्येक नागरिकांना किमान जीवनमान जगण्याची व प्रगतीची संधी उपलब्ध होते ते कल्याणकारी राज्य होय, अशी कल्याणकारी राज्याची व्याख्या केली. शिक्षण, रोजगार, वैद्यकीय मदत, सामाजिक सुरक्षितता याची जबाबदारी जेव्हा एखादे सरकार स्वीकारते तेव्हा त्याला कल्याणकारी राज्य म्हणतात. राज्याचे उद्दिष्ट सत्तेचा वापर नसून सेवेचे कर्तव्य बजावणे हे आहे असे संकल्पनेत गृहीत आहे.[४]

स्वातंत्र्योत्तर भारतात अनेक योजना राबविण्यात आल्या. त्यादृष्टीने कायदे करण्यात आले. भारतीय संविधानाच्या सरनाम्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायाची प्रस्थापनेची हमी दिली आहे त्यानुसार कल्याणकारी राज्याच्या अंमलबजावणीला देण्यात आला. या संदर्भात गॅस, डिझेल, पेट्रोल यांच्या किंमतीचे उदाहरण घेता येईल, लोकांना या वस्तू स्वस्त मिळाव्या म्हणून त्यांना सरकारतर्फे झीज सोसून भरघोस अनुदान वर्षानुवर्ष देण्यात आले. त्यांच्या किंमती वाढल्या तर अप्रत्यक्षपणे महागाई भडकेल म्हणून अनुदानाची तरतूद कल्याणकारी धोरणातून केली जाते. मात्र आता सरकारचे हे धोरण बदलते आहे. जागतिक बाजार पेठेशी गॅस, डिझेल, पेट्रोल यांच्या किंमतीचा सरळ मेळ घालण्याचे जाहीर झाले आहे. [५]

**सामाजिक प्रश्न -**

परिवर्तनाच्या प्रक्रियेतून उद्भवणारे सामाजिक प्रश्न अधिक महत्त्वाचे असतात. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इ.स. १९५६ साली आदिवासींच्या ४१४ विविध जमातीची नोंद करण्यात आली. भारतातील नागालँड, मेघालय, मिझोराम, अरुणाचल प्रदेश या राज्यामध्ये आदिवासींचे प्रमाण लक्षणीय आहे. बहुतेक आदिवासी जमातीचे वास्तव्य पहाडी किंवा जंगली प्रदेशात असते. वाहतूक आणि दळण वळणाच्या साधनांच्या अभावी त्यांच्याशी संपर्क ठेवणे सुद्धा कठीण होते. त्यामुळे शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पुष्कळदा जाऊन पोहोचत नाही. काही आदिवासी जमाती उदरभरणासाठी लोकांशी संपर्क ठेवतात. त्यातून त्यांच्यात आर्थिक आणि शारीरिक शोषणाला

प्रारंभ होतो. भय, अज्ञान, अशिक्षितपणा यांच्यामुळे ते वर्षानुवर्ष शोषित राहिले त्यांच्या असहातेचा फायदा घेऊन मिशनरी लोक त्यांना धर्मांतराला प्रवृत्त करतात.[६]

आपल्या देशातील समाज व्यवस्थेचा दुसरा भाग म्हणजे ग्रामीण समुदाय होय. म. गांधींनी खरा भारत खेड्यात आहे, खेड्याकडे चला असा नारा दिला होता. भारतातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास ८० टक्के समाज हा खेड्यात राहतो. बहुतेक सर्व खेड्यामध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय असतो. वाहतूक आणि दळणवळणाच्या सोय अपुऱ्या असल्याकारणाने खेड्याशी संपर्क ठेवणे कठीण जात असते. परंतु आता आधुनिक उपकरणामुळे हे अडचण दूर झाली आहे.[७]

सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने या पद्धतीचा लाभ उच्च जातीयांना झाला आणि निम्न जातीय त्यांच्या शोषणाला बळी पडतो असे दिसते. सर्व खेड्यापाड्यांमध्ये जातीभेदाचे प्रमाण लक्षणीय स्वरूपाचे आहे. त्यांच्यात गतिशीलतेचा आणि परिवर्तनाचा अभाव दिसून येतो. संयुक्त कुटुंब पद्धतीचे फायदे आणि तोटे भारतातील ग्रामीण समुदायाला भोगावे लागले आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक सरकारी योजना त्यांच्यामार्फत जाऊन पोहोचल्या असून त्यांच्या मधील राजकीय जागृती देखील वाढीला लागले आहे.[८]

वाढती लोकसंख्या हा फार मोठा सामाजिक प्रश्न भारतापुढे आ वासून उभा ठाकला आहे त्यामुळे अनेक पंचवार्षिक योजनाची अंमलबजावणी होऊ नये ही विकासाचे फळे कोणाच्याच पदरात पडतो अशी स्थिती नाही. ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे त्या प्रमाणात राष्ट्रीय संपत्ती, दरडोई उत्पन्न वाढले नाही. लोकांचे जीवनमान उंचावलेले दिसत असले तरी ते फार गुणवत्ता पूर्ण आहे असे म्हणता येत नाही. सक्तीचे कुटुंब नियोजन सर्वांवर लादल्याशिवाय या प्रश्नाचे डंकता होणे कठीण वाटते.[९] काही शहरांमध्ये ठाण मांडून बसलेल्या धार्मिक, वर्णीय, कामगार, कारखानदार, सांस्कृतिक ताण तणाव हाही मोठा सामाजिक प्रश्न आहे. संप, बंद, मोर्चा, हरताळ, रास्ता रोको इत्यादीमुळे सामाजिक व्यवहार विस्कळीत होतात. खून, चोऱ्या, दरोडे, मारामाऱ्या, बलात्कार, गुन्हेगारी, बाल गुन्हेगारी यांचे प्रमाण वाढत असून सामाजिक सुरक्षितता कमी होत चालली आहे. नोकरी धंद्याच्या निमित्ताने ग्रामीण समुदायाचे लोक शहरात स्थलांतर होत असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.[१०]

आधुनिकीकरणाचे कोण ग्रामीण आणि आदिवासी जमातीपर्यंत जाऊन पोहोचलेले आहे. खेडेगावाचे शहरीकरण झपाट्याने होत आहे. आपले मुलं/मुलींनी शिकावे त्यांचे जीवनमान सुधारावे म्हणून ग्रामीण आदिवासी लोक शहराकडे येत आहेत. पारंपारिक शेतीमध्ये आधुनिक

तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात येत आहे. ग्रामीण समाजाच्या उद्धारासाठी महात्मा गांधींनी सर्वोदय योजना सुचविली होती. विनोबाजींनी भूदान चळवळ केली यातून जेवढे कार्य झाले त्यापेक्षा अधिक परिवर्तन आधुनिकीकरणातून झाले असे दिसते. शिक्षणाचा वाढता प्रसार हे आधुनिकीकरणाचे एक महत्त्वाचे कारण समजले जाते. [११]

**किसान चळवळ -**

शेतकरी सुखी तर ज्यात सुखी असे नेहमी म्हटले जाते अशा शेतकऱ्यांनी धान्य पिकवावी आणि त्यांचा उपयोग मध्यमवर्गीय लोकांनी अर्थात मध्यस्थ आणि जमीन मालकांनी घ्यावा असेच निरंतर चालत आले आहे. जमीनदार, सेरजामदार व सर्व सत्ताधीश हे सर्व शेतकऱ्याचे मालक आणि तो त्यांचा दास ही स्थिती शतकानुशतके कायम होती. इ.स. १८९६ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी ब्रिटिश सरकारने हा महसूलात सूट दिली नाही तेव्हा लोकमान्य टिळकांनी कर भरू नका असे शेतकऱ्यांना आवाहन केले होते.[१२]

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आखण्यात आलेल्या पंचवार्षिक योजनांमध्ये शेती विकासाला सर्वोच्च असे प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे ३० लाख कुळांना २८ लाख हेक्टर जमिनीची मालकी प्राप्त झाली. कसे त्याची जमीन न हे धोरण अमलात आणण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले. विनोबा भावे यांनी सर्वोदय समाज स्थापना करून विनोबाजींने तेलंगणात शांती यात्रा सुरू केली. नळगोंडा जिल्ह्यात पाचमल्ली या गावी तेथील हरिजनांनी शेत जमिनीची मागणी केली त्यावेळी रेड्डी नावाच्या सद्गृस्ताने आपली १०० एकर जमीन विनोबा भावे यांना दान केली होती.[१३]

**कामगार चळवळ -**

ब्रिटिश राजवटीने भारतात उद्योग धंदे आणि गिरण्या कारखान्याच्या उभारणीला प्रारंभ केला. त्यातून कामगार वर्गाचा जन्म झाला. १८८५ मध्ये मुंबई आणि कलकत्ता या ठिकाणी कामगारांचे संप झाले. मुंबईचे एक गिरणी कामगार श्री नारायण मेघाजी लोखंडे यांनी इ.स. १८८४ मध्ये आणि १८८९ मध्ये मागणी पत्र तयार करून यावर पाच हजार कामगाराच्या सह्या गोळा केल्या होत्या. १८९० मध्ये ते १९१७ या कालावधीमध्ये कामगारांचे अनेक संप मोर्चे झाले. यानिमित्ताने कामगारांच्या राजकीय जागृतीचे दर्शन झाले.[१४]

**महिला चळवळ -**

भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर किसान आणि कामगारांच्या स्थिती गतीत अनेक परिवर्तने झाले. त्यांच्या संघटित चळवळीचा उदय होऊ लागला. त्याचप्रमाणे १८२४ साली कुबुदुला अमेरिकन मिशनने मुलीची पहिली शाळा सुरू केली. इ.स. १८४८, १८५१, १८५२ यावर्षी

महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुण्यात सुरू केलेल्या तीन मुलीच्या शाळेमधून महार, मांग, चांभार व अतिशुद्राच्या मुली शिकू लागल्या. महिलांना झालेला हा पहिला शिक्षण स्पर्श पुढील काळात त्यांच्याच उद्धाराचा उपकारक काळ ठरलेला दिसतो. १८६५ मध्ये फुल्यांनी बाल हत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली त्यांनी महिलाची दूर्दशा करणाऱ्या केशवपण, बालविवाह इत्यादी अनेक रूढीवर हल्ले चढविले. गो.गा. आगरकर, धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, बाबासाहेब आंबेडकर आदी समाज सुधारकांनी महिलांच्या सर्वांगीण उद्धारासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना मार्गदर्शन करीत असताना असे आवाहन केले की, तुम्ही स्वतः अपृश्य समजू नका तुम्ही प्रतिज्ञा करा की अशा कलंकित स्थितीत आम्ही यापुढे राहणार नाही, ज्ञान आणि विद्या या गोष्टी तुमच्यासाठी खास आवश्यक आहेत.[१५]

**दलित चळवळ -**

दलित ही संज्ञा पूर्वास्पृश्य जातीच्या लोकांना वापरली जाते. या जाती धर्मांने हिंदू असल्या तरी त्यांना चातुर्वर्ण्य व्यवस्थेत कोणतेच स्थान नव्हते. ज्याचे शोषण झाले आहे ज्यांना विकासाची संधी नाकारण्यात आली असा समाज किंवा समुदाय म्हणजे दलित होय. दलित चळवळीचे एकमुखी नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. १९२० साली त्यांनी मूक नायक हे पाक्षिक सुरु केली. यामध्ये त्यांनी दलिताच्या प्रश्नांना वाचा फोडली. १९२४ साली बहिष्कृत भारत हितकारणी सभेची स्थापना केली. १९२६ साली महार परिषदेत दलित समाजाने गावकी व वतनदारीचे हक्क सोडण्याचा संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांच्या शोषणाला आव्हान देऊन त्यांना या गुलामगिरीतून मुक्त केले. तशी तजवीज भारतीय संविधानात करून त्यांच्या मुक्तीचे प्रवेशद्वार खुले करून दिले.[१६]

तात्पर्य पाच हजार वर्षांच्या इतिहासात भारतात वर्ण, वंश, जाती जमाती सांस्कृतिक विशेष यांचा संभर मोठ्या प्रमाणात झाला. फुटीरतावादी चळवळी या समताधिष्ठित समाज रचनेच्या मार्गातील फार मोठा अडथळा आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हाच कुठे सीमेवरून कुठे पाण्यावरून कुठे भाषेवरून तर कुठे नव्या राज्याच्या मागणीवरून सातत्याने संघर्ष चालू आहे. यातून नवे नेतृत्व जन्माला येत असून निवडणुकीच्या मार्गातून जे संसद भवनापर्यंत जाऊन पोहचत आहेत. यामधून आणखी नवनव्या प्रश्नांना जन्म मिळत असून अधिकाधिक गुंता वाढीस लागला आहे.

**संदर्भसूची -**

१. डॉ. ग्रोवर बी.एल., डॉ. बेल्हेकर एन.के. - आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद अँड कंपनी प्रा. लि., रामनगर, दिल्ली, २००८, पृष्ठ क्रमांक ३४७,४८.

२. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ३९९.

३. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ४११,१२.

४. दास संतोष, गुल्ड विल्यम, जॅफ़लो ख्रिस्तफ, भाषांतर वाळूज वैभव- लंडनमधील बाबासाहेब, मधुश्री पब्लिकेशन पुणे, १४ एप्रिल २०२४, पृष्ठ क्रमांक १५९.

५. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक १६१, १६२.

६. मून वसंत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रीय पुस्तक (अनुवाद-पांडे प्रशांत) न्यास भारत सरकार नई दिल्ली, ९ वी आवृत्ती २०२०, पृष्ठ क्रमांक १२०.

७. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक १२६,२७.

८. कोठेकर शांता - आधुनिक भारताचा इतिहास, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, दहावी आवृत्ती, जून २०१३, पृष्ठ क्रमांक ३१९.

९. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ३२२.

१०. सरकार सुमित - आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, पटना, १९९२, पृष्ठ क्रमांक २११.

११. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक २५८.

१२. डॉ. खन्ना कैलास - आधुनिक भारत का सामाजिक इतिहास, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दरिया गंज, नई दिल्ली २००४, पृष्ठ क्रमांक २१,२२.

१३. गोपाल एस., अनुवाद देशपांडे सरोज - ब्रिटिशांची भारतातील राजनीति, डायमंड पब्लिकेशन १६९१ सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली-२००६, पृष्ठ क्रमांक ३७३.

१४. उपरोक्त-पृष्ठ क्रमांक १६५,६६.

१५. आचार्य जावडेकर श.द. आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, पुनर्मुद्रन १९९४, पृष्ठ क्रमांक ५१९,२०.

१६. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक ५२२-२३.